संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# होमगार्ड संकल्पनेचा विस्तार सहज शक्य

सुरक्षितता हा विषय अनेक दृष्टींनी विचारात घेतला पाहिजे. साधारणपणे सुरक्षितता म्हटल्यानंतर कायदा सुव्यवस्था किंवा पोलीस यंत्रणा अशाशीच तो जोडला जातो. परंतु प्रत्येकालाच आपल्या भवितव्याचीदेखील सुरक्षितता महत्त्वाची वाटत असते. समाजात राहत असताना समाजात कोणत्याही अनुचित गोष्टी घडू नयेत यासाठी सामाजिक सुरक्षितता महत्त्वाची असते. वैयक्तिक जीवनामध्ये प्रत्येकाला आर्थिक स्थिरता म्हणजेच किमान गरजा भागतील अशा प्रकारचे आर्थिक उत्पन्न अपेक्षित असते. त्याला आर्थिक सुरक्षितता म्हणता येऊ शकते. भविष्यकाळात येणाऱ्या अडीअडचणींना सामोरे जाता यावे यासाठीदेखील आधीपासूनच काही योजनांची तयारी करून ठेवणे हादेखील सुरक्षेचा एक भाग ठरतो. दुर्दैवाने आज सर्वच स्तरावर असुरक्षिततेचीच भावना जास्त पाहायला मिळते. प्रत्येक व्यक्ती प्रामुख्याने आपल्या आर्थिक सुरक्षिततेचा प्रयत्न करीत असतो. यासाठीच त्याला पुरेसा रोजगार किंवा नोकरी व्यवसाय आवश्यक असते. अनेक प्रकारच्या सामाजिक संस्थांनासुद्धा आपापल्या संस्था सुरळीतपणे चालाव्यात यासाठीदेखील काळजी घ्यावी लागत असते. मग त्यात अगदी शैक्षणिक संस्थांपासून ते सहकारी गृहनिर्माण संस्थांपर्यंत सर्वांनाच आपापल्या संस्थांची सुरक्षितता जपायची असते. यासाठीच केवळ पोलीस व्यवस्थेवर अवलंबून न राहता जवळपास सगळ्याच ठिकाणी खाजगी सुरक्षा रक्षक नेमले जातात. रोजगाराची ही आवश्यकता असल्याने आज देशभरात असे सुरक्षा रक्षक पुरवणाऱ्या हजारो संस्था पाहायला मिळतात. महाराष्ट्रातही त्यांची बरीच मोठी संख्या आहे. अर्थातच असे सुरक्षा रक्षक नेमूनही गैरप्रकार होणे कमी झालेले नाही. अनेक ठिकाणी तर खासगी सुरक्षा रक्षकांकडूनच अनुचित प्रकार होत असल्याचे पाहायला मिळते. शिक्षण संस्था किंवा गृहनिर्माण सोसायट्या किंवा अगदी काही कॉर्पोरेट कंपन्यांमध्येसुद्धा असे प्रकार घडताना दिसतात. सगळ्याच ठिकाणी सरकारमान्य पोलीस पोहोचू शकत नाहीत. यावरचा एक पर्याय म्हणून महाराष्ट्र सरकारने होमगार्ड्सची सेवा शिक्षण संस्था आणि गृहनिर्माण सोसायट्यांना उपलब्ध करून देण्याचा विचार सुरू केला आहे. हा प्रस्ताव निश्चितच अनेक अर्थांनी उपयुक्त ठरू शकतो.

### शाळा, हौसिंग सोसायट्यांसाठी उपयुक्त

आज राज्यभरात जवळपास ४८ हजार होमगार्ड्स आहेत. त्यांना काही विशिष्ट प्रसंगांच्यावेळेला सुरक्षिततेच्या कामासाठी बोलावले जाते. त्यातही प्रामुख्याने वेगवेगळ्या उत्सव काळांमध्ये या होमगार्ड्सची मदत घेतली जाते. ते जेवढे दिवस काम करतात. त्यानुसार त्यांना मानधन दिले जाते. एका दिवसासाठी १२८३ असे मानधन त्यांना दिले जात असते. दर तीन वर्षांनी त्यांना दिलेल्या सनदीचे नूतनीकरण होत असते. विशेषतः गणेशोत्सव, नवरात्रोत्सव अशा मोठ्या सणकाळामध्ये या होमगार्ड्सची मदत घेतली जाते. ज्या होमगार्ड्सनी पन्नास दिवस काम केलेले असेल त्यांच्याच सनदीचे नूतनीकरणही केले जाते. या होमगार्ड्सना महिन्याकाठी निश्चित स्वरूपाचे मानधन नसते. परंतु कोणत्याही आणीबाणीच्या किंवा तातडीच्या प्रसंगांमध्ये त्यांना हजर होण्याचे आदेश दिले जाऊ शकतात. म्हणजेच शासनाच्या मान्यतेने चालणारी ही एक पर्यायी सुरक्षा व्यवस्था आहे. ज्याचा निश्चितपणे मोठा उपयोगही होत असतो. निमित्त किंवा प्रसंगानुरूप का असेना, परंतु राज्यातील ४८ हजार होमगार्ड्सना आपला इतर उद्योग व्यवसाय सांभाळून पोलिसांना मदत करता येते आणि थोडाफार रोजगारही मिळवता येतो. परंतु याच होमगार्ड व्यवस्थेचा सुरक्षितता आणि रोजगार या दोन्ही दृष्टीकोनातून निश्चितच विस्तार करता येऊ शकतो. आणि सहकारी हौसिंग सोसायट्या, शैक्षणिक संस्था एवढेच नव्हे तर सहकारी बँकांसाठीसुद्धा होमगार्ड्सची सेवा पुरवता येऊ शकते. आज खासगी सुरक्षा एजन्सीवर अवलंबून राहावे लागते. शिवाय जास्त पैसेदेखील मोजावे लागतात. अशा परिस्थितीत राज्य सरकारने पुढाकार घेऊन होमगार्ड्सची सेवा अधिक भक्कम केली तर त्यातून यापेक्षा दुप्पट-तिप्पट लोकांना रोजगार मिळू शकेल. ज्या संस्थांना ही सेवा पुरवली जाईल त्यांच्याकडून मिळणाऱ्या पैशातून होमगार्ड्सचे महिन्याचे पगारही देता येऊ शकतील. म्हणूनच सुरक्षितता हा प्रकार व्यापक अर्थाने लक्षात घेतला तर सुरक्षितता देणाऱ्यांच्याही आर्थिक सुरक्षिततेचा विचार महत्त्वाचा ठरतो. संस्थांची आवश्यक ती गरज पूर्ण झाल्याने तेदेखील आपल्या सुरक्षिततेविषयी निर्धास्त होऊ शकतील.

### रोजगाराची सुरक्षितता

खासगी सुरक्षा रक्षकांकडे पाहण्याचा दृष्टीकोन आणि होमगार्ड पथकाची सेवा यामध्ये बराच मोठा फरक पडतो. विशेषतः अनेक शाळा किंवा महाविद्यालयांमधून घडणाऱ्या अनुचित प्रकारांना या होमगार्ड सेवेमुळे लगाम बसू शकेल. ही सरकारमान्य सुरक्षा व्यवस्था असल्याने त्याचा एक वेगळा प्रभावही निर्माण होऊ शकतो. खरे तर होमगार्ड या संकल्पनेचा अधिकाधिक वापर करून घेण्याच्यादृष्टीने सर्वंकष प्रस्ताव तयार झाला पाहिजे. अगदी पोलिसांसारखे अधिकार किंवा पगार जरी देता येत नसले तरी किमान शैक्षणिक पात्रता असलेल्या होमगार्ड्सना महिन्याकाठी उत्पन्न मिळाले तर तोदेखील त्यांच्यासाठी मोठा आधार ठरू शकतो. एकूणच तरुणांच्या रोजगार निर्मितीला त्याचा हातभार लागू शकतो. आज पोलीस भरतीच्या काळातसुद्धा अक्षरशः हजारो तरुण अर्ज करीत असतात त्या सर्वांचीच निवड होऊ शकत नाही. निवड न झालेल्यांचासुद्धा या होमगार्ड्ससाठी विचार होऊ शकतो. या तरुणांच्या रोजगार सुरक्षिततेबरोबरच वेगवेगळ्या संस्थांना सुरक्षितता देण्याचे कामही पार पाडता येऊ शकते. यासंदर्भात सरकारने गांभीर्याने विचार करून तितक्याच वेगाने प्रत्यक्ष कृतीही केली पाहिजे. आतापर्यंत दुर्लक्षित राहिलेल्या या होमगार्ड संकल्पनेला एक नवी ऊर्जा यानिमित्ताने मिळू शकेल. यासाठीच सरकारला स्वतःच्या तिजोरीतून खर्च करावा लागणार नाही. ज्या संस्थांना सुरक्षितता दिली गेली आहे त्यांच्याकडूनच त्याबद्दलचा मोबदला मागता येणार आहे. सरकारला फक्त त्याची अधिकृतता सांभाळून मध्यस्थता करायची आहे. यामध्ये महिलांनाही मोठ्या प्रमाणावर रोजगाराची संधी मिळू शकते.